# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

**विषय:–उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना देय असलेल्या सवलतीबाबत**

## ! प्रकटन !

**ऑटिस्टिक (स्वमग्न)** या प्रकारातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवलतीसंदर्भात दिनांक ३०/०७/२०२५ रोजी
वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती खालीलप्रमाणे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र
(इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षांसाठी प्रविष्ट होणाऱ्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग
विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार शासन निर्णय क्र.संकिर्ण–२०१७/(११८/१७)/एसडी–६, दि. १६ ऑक्टोबर २०१८
नुसार विविध सवलती मंडळाकडून दिल्या जातात.

केंद्र शासनाने दिव्यांग विद्यार्थ्यांसंदर्भात स्वावलंबन प्रमाणपत्र (Unique Disability ID Card) निश्चित केलेले असून
एखाद्या विद्यार्थ्याकडे जर दिव्यांग प्रमाणपत्राऐवजी असे स्वावलंबन प्रमाणपत्र (Unique Disability ID Card) असेल व
त्यांनी सदर प्रमाणपत्र विभागीय मंडळ कार्यालयास दिव्यांग प्रस्तावासोबत सादर केलेले असल्यास विविध सवलतीकरीता
अशा विद्यार्थ्यांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक (Civil Surgeon) यांनी प्रतिस्वाक्षरी असलेले विहित नमुन्यातील वैद्यकीय
प्रमाणपत्राची मागणी करू नये असे क्र.रा.मं./परीक्षा ५/५१८५ दि. २३/११/२०२३ च्या पत्रान्वये सर्व विभागीय
मंडळांना कळविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने दिव्यांग विद्यार्थ्यांना मंडळाकडून नियमानुसार विविध सवलती दिल्या
जातात.

उपरोक्तप्रमाणे सन २०२३–२४ पासून कार्यवाही करण्यात येत असून निर्धारित सुविधेपासून कोणताही दिव्यांग
विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता मंडळाकडून घेण्यात आलेली आहे. जरी एखाद्या विद्यार्थ्याकडे स्वावलंबन
प्रमाणपत्र (Unique Disability ID Card) नसले तरी त्याच्याकडे विहीत नमुन्यातील वैधकीय प्रमाणपत्र असेल तर अशा
दिव्यांग विद्यार्थ्यांना मंडळाकडून नियमानुसार विविध सवलती देण्याबाबतची कार्यवाही मंडळाकडून केली जाते.

त्यामुळे याबाबत संबंधित प्राचार्य, मुख्याध्यापक, पालक व विद्यार्थी यांनी संभ्रम बाळगू नये.

दिनांक:-३०/०७/२०२५

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

क्र.कोविमं/१२वी/परीक्षा/2790
दिनांक :- ३१/०७/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक आणि प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना देय असलेल्या सवलतीबाबत..**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना देय असलेल्या सवलतीबाबत प्रकटनानुसार आपले स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावी.

**(बी.एम.किल्लेदार)**
**प्र.विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**